**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

## ❖ श्रीगणेशोत्सव 2025 निमित्त विसर्जनकरीता उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावांचा पाहणी दौरा

श्रीगणेशोत्सव 2025 विसर्जन निमित्त मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 26 ऑगस्ट 2025 रोजी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, पोलिस उपायुक्त राहुल चव्हाण (भा.पो.से.), शहर अभियंता दिपक खांबित यांनी शहरातील विविध ठिकाणी श्रीगणेश विसर्जनाकरिता उभारण्यात आलेल्या प्रमुख कृत्रिम तलाव स्थळांना भेट देऊन तेथील तयारीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

काशिमीरा जरीमरी तलाव, सातकरी तलाव मिरा रोड, साईदत्त तलाव पेणकरपाडा, शिवार गार्डन तलाव, जेसल पार्क चौपाटी तसेच भाईंदर पश्चिम चौपाटी, राई तलाव, मुर्धा तलाव या ठिकाणी उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान विसर्जन काळात नागरिकांसाठी करण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा सविस्तर आढावा घेतला. सुरक्षिततेसाठी केलेल्या तयारी, स्वच्छतेची काटेकोर व्यवस्था, वीजपुरवठा आणि प्रकाशयोजना, वैद्यकीय सुविधा, पोलीस व सुरक्षेची यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. या प्रसंगी उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त कविता बोरकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, पोलिस निरीक्षक, महापालिकेचे कनिष्ठ अभियंता यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

३३ कृत्रिम तलावांसोबत मुर्ती स्विकृती केंद्र उभारण्यात आले आहेत. तसेच 6 फूटाखालील श्रीगणेश मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जन करणे बंधनकारक आहे. पूजासाहित्य व निर्माल्य पाण्यात न टाकता स्वतंत्ररित्या जमा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे. समुद्र, खाडी व तलावांमध्ये प्लास्टिक टाकू नये. तसेच विसर्जनाच्या वेळी प्रशासन व पोलीस यांचे मार्गदर्शन घेऊन शिस्त पाळावी. श्री. गणेशोत्सव हा सामाजिक ऐक्याचा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारा उत्सव आहे. त्यामुळे स्वच्छता, सुरक्षितता आणि पर्यावरण संरक्षण यांना प्राधान्य देत नागरिकांनी हा उत्सव पर्यावरणपूरक साजरा करावा, असे मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.